Annexure - VII

**मेसर्स एमव्हीपी ऑइल्स अँड एनर्जीज प्रायव्हेट लिमिटेड यांच्या प्रस्तावित ३० टीपीडी बायोडिझेल उत्पादन प्रकल्पासह १० टीपीडी साबण व १० टीपीडी फॅटी ॲसिड उत्पादन प्रकल्पाच्या पर्यावरणीय जनसुनावणीचे इतिवृत्त, दिनांक १६ जुलै २०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजता श्रीराम बँक्वेट हॉल, ३-/१, आंध्र बस स्टँड समोर, बासर रोड, धर्माबाद, तालुका: धर्माबाद, जिल्हा: नांदेड, महाराष्ट्र – ४३१८०९ येथे आयोजित करण्यात आले.**

---

मेसर्स एमव्हीपी ऑइल्स अँड एनर्जीज प्रायव्हेट लिमिटेड यांच्या प्रस्तावित ३० टीपीडी क्षमतेच्या बायोडिझेल उत्पादन प्रकल्पासह १० टीपीडी साबण व १० टीपीडी फॅटी ॲसिड उत्पादन प्रकल्पाच्या पर्यावरणीय जनसुनावणीचे आयोजन दिनांक : १६ जुलै २०२६ रोजी दुपारी : ०३.०० वाजता श्रीराम बँक्वेट हॉल, ३-८/१, आंध्र बस स्टँड समोर, बासर रोड, धर्माबाद, तालुका: धर्माबाद, जिल्हा: नांदेड, महाराष्ट्र येथे करण्यात आले.

सदर पर्यावरणीय जनसुनावणीबाबतची सूचना स्थानिक मराठी दैनिक सकाळ तसेच इंग्रजी राष्ट्रीय वृत्तपत्र टाइम्स ऑफ इंडिया मध्ये दिनांक : १३/०६/२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. त्याच्या प्रती **परिशिष्ट – I** म्हणून जोडण्यात आलेल्या आहेत.

सदर पर्यावरणीय जनसुनावणी दिनांक : १६ जुलै २०२६ रोजी दुपारी: ०३.०० वाजता श्रीराम बँक्वेट हॉल येथे मा. जिल्हाधिकारी यांच्या वतीने डॉ. रत्नदीप गायकवाड, अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. श्री. मनीष होळकर, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, छत्रपती संभाजीनगर हे समितीचे सदस्य म्हणून उपस्थित होते. तसेच श्री. सूर्यकांत जे. शिंदे, उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नांदेड यांनी जनसुनावणी समितीचे संयोजक म्हणून काम पाहिले. ही जनसुनावणी समिती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयीन आदेश दिनांक २६/०६/२०२६ अन्वये गठित करण्यात आली होती. त्याची प्रत **परिशिष्ट – II** म्हणून जोडलेली आहे.

सदर जनसुनावणीस जनसुनावणी समितीचे सदस्य, पर्यावरण प्रेमी, स्थानिक ग्रामस्थ, शेतकरी, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, प्रकल्प प्रवर्तक, अध्यक्ष व संयोजक उपस्थित होते. उपस्थित नागरिक व सहभागींची उपस्थिती पत्रक **परिशिष्ट – III** म्हणून जोडण्यात आलेली आहे.

• उद्देश व कार्यपद्धती :-

संयोजकांनी अध्यक्ष, अपर जिल्हाधिकारी, नांदेड, सदस्य, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद, उपस्थित नागरिक, पर्यावरण प्रेमी व सर्व मान्यवरांचे स्वागत करून अध्यक्ष महोदयांची जनसुनावणी सुरू करण्यास परवानगी मागितली.

संयोजकांनी माहिती दिली की, भारत सरकारच्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाच्या (MoEF&CC) दिनांक: १४ सप्टेंबर २०२६ च्या पर्यावरण परिणाम मूल्यांकन (EIA) अधिसूचनेनुसार तसेच दिनांक: १ डिसेंबर २००९ रोजी करण्यात आलेल्या सुधारणांनुसार, अधिसूचनेच्या अनुसूचीतील विशिष्ट प्रकल्पांसाठी पूर्व पर्यावरणीय जन सल्लामसलत (Public Consultation) घेणे बंधनकारक आहे.

जनसुनावणीची सूचना दिनांक: १३/०६/२०२६ रोजी स्थानिक स्तरावर मोठ्या प्रमाणात प्रसारित होणाऱ्या दैनिक सकाळ (मराठी) व द टाइम्स ऑफ इंडिया (इंग्रजी) या वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित करण्यात आली होती.

पर्यावरण परिणाम मूल्यांकन (EIA) अहवाल, प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये असलेला कार्यकारी सारांश (Executive Summary) इंग्रजी व मराठी भाषेत तसेच इतर आवश्यक माहिती व कागदपत्रे शासनाच्या विविध

कार्यालयांमध्ये तसेच संबंधित ग्रामपंचायतीमध्ये भारत सरकारच्या दिनांक: १४ सप्टेंबर २००६ च्या अधिसूचनेनुसार सर्वसामान्य नागरिकांच्या पाहणीसाठी उपलब्ध करून देण्यात आली होती.

या सूचनेच्या प्रसिद्धीपासून ३० दिवसांच्या आत नागरिकांकडून ई-मेलद्वारे किंवा लेखी स्वरूपात सूचना, मते, अभिप्राय व हरकती मागविण्यात आल्या होत्या. या कार्यालयास ई-मेलद्वारे किंवा लेखी स्वरूपात कुठलीही सुचना किंवा हरकत प्राप्त झालेली नाही.

जनसुनावणी समितीची स्थापना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयीन आदेश दिनांक: १८/११/२०२२ अन्वये करण्यात आली होती.

संयोजकांनी पर्यावरणीय जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांना पर्यावरण सल्लागारास प्रकल्पाचे सादरीकरण सुरू करण्याची विनंती केली.

मा. अध्यक्षांच्या आदेशानुसार प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार, श्री. मिलिंद जोशी यांनी उपस्थित सर्वांचे स्वागत करून पर्यावरण व्यवस्थापन आराखडा (ETA) तसेच प्रस्तावित प्रकल्पाशी संबंधित विविध बाबींचे सादरीकरण केले.

सादरीकरणामध्ये खालील बाबींचा समावेश होता :

- प्रकल्पाचे स्थान, अक्षांश-रेखांश, नकाशा, वनक्षेत्र, सीआरझेड (CRZ) स्थिती, प्रकल्पाची वैशिष्ट्ये, महत्त्व, परिणाम व जमीन वापर.
- प्रकल्पाची उद्दिष्टे, सामाजिक स्थिती व प्रकल्पामुळे निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधी.
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश व निष्कर्ष.
- सामाजिक व आर्थिक परिस्थितीचे विश्लेषण.
- हवा, पाणी, जमीन, ध्वनी तसेच प्रकल्प प्रभावित क्षेत्रांची माहिती.
- प्रस्तावित प्रकल्पामुळे हवा, पाणी, विस्थापन व जैवविविधतेवर होणारे परिणाम आणि त्यांचे व्यवस्थापन.
- प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर करण्यात येणाऱ्या पर्यावरण व्यवस्थापनाची माहिती.
- इतर पर्यावरण व्यवस्थापनासंबंधी माहिती.

पर्यावरण सल्लागारांनी सादरीकरणा दरम्यान माहिती दिली की, मेसर्स एमव्हीपी ऑइल्स अँड एनर्जीज प्रायव्हेट लिमिटेड यांचा प्रस्तावित ३० टीपीडी क्षमतेचा बायोडिझेल उत्पादन प्रकल्प, १० टीपीडी साबण उत्पादन व १० टीपीडी फॅटी ॲसिड उत्पादन प्रकल्प हा सर्व्हे क्र.:३२/३ व ३४/ए, प्लॉट क्र. २-१/१/सी, गाव: बाळापूर, तालुका: धर्माबाद, जिल्हा: नांदेड, महाराष्ट्र येथे प्रस्तावित आहे.

प्रस्तावित प्रकल्पामुळे नवीन रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल तसेच आरोग्य, शिक्षण व सामाजिक पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा होण्यास मदत होईल. प्रकल्पासाठी जवळील गावांतील स्थानिक अर्धकुशल व अकुशल कामगारांना प्राधान्य देण्यात येईल.

सदर प्रकल्पाची एकूण किंमत ₹ ५.१२ कोटी इतकी असून, प्रकल्पाच्या बांधकाम टप्प्यात राबविण्यात येणाऱ्या पर्यावरण व्यवस्थापनाच्या उपाययोजनांची सविस्तर माहिती पर्यावरण सल्लागारांनी सादर केली.

पर्यावरण सल्लागारांनी सांगितले की, प्रस्तावित प्रकल्प हा धर्माबाद तालुका, महाराष्ट्र राज्य व देशाच्या हिताचा असून या प्रकल्पामुळे स्थानिक विकासास चालना मिळेल.

यानंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नांदेडचे उपप्रादेशिक अधिकारी व जनसुनावणी समितीचे संयोजक श्री. मनीष होळकर यांनी उपस्थित नागरिकांना प्रकल्पासंदर्भातील त्यांची मते, सूचना व हरकती मांडण्याचे आवाहन केले, जेणेकरून पर्यावरणीय जनसुनावणीचा उद्देश पूर्ण होईल.

त्यानंतरची कार्यवाही खालीलप्रमाणे झाली:

| अ. क्र. | जनसुनावणीदरम्यान उपस्थित करण्यात आलेले मुद्दे | प्रकल्प प्रस्तावकाने दिलेले उत्तर / आश्वासन | जनसुनावणी समितीने केलेल्या सूचना |
|---|---|---|---|
| 1 | **श्री. वर्णी नागभूषण, रा. बाळापुर, ता. धर्माबाद भाजप जिल्हा उपाध्यक्ष, जि. नांदेड** यांनी आपले मुद्दे उपस्थित करताना सांगितले की, त्यांची याबद्दल कोणतीही तक्रार नाही सूचना आहे की, याच्यामध्ये वायू प्रदूषणाचा प्रोजेक्ट बसविला आहे का? हा वायू प्रदूषण कंट्रोल करण्याचा प्रोजेक्ट आहे का ? | **श्री. राजेश मानकर, पर्यावरण सल्लागार** या मुद्याला उत्तर देताना त्यांनी सांगितले की, जोशी साहेबांनी या प्रोजेक्टचे प्रेझेंटेशन दिल आहे. त्या प्रेझेंटेशनमध्ये त्यांनी सांगितले की, वायू प्रदूषण चे सोर्स किंवा स्त्रोत हे फक्त दोनच आहे. एक जो आहे तो डीजीसेट १२५ KV चा राहणार. त्यावर त्यांनी सांगितले की, आज कालची जे डीजीसेट आहे ते अत्याधुनिक आहे. त्यामध्ये फारसा धुळ किंवा नॉईस जनरेशन होत नाही. त्यामुळे त्या डीजीसेट मध्ये स्वत: इनबिल्ट वायू प्रदूषण नियंत्रण प्रणाली राहते. त्यामध्ये थर्मिक फ्लुइड बॉयलर राहणार आहे आणि त्याच्यासाठी CPCB च्या मानकांनुसार बॉयलरला चिमणी दिल्या जाईल व वायू प्रदूषण नियंत्रण प्रणाली लावून कुठलाही वायू प्रदूषण होणार नाही, याची त्यांनी १००% खात्री दिली. | |
| 2 | **श्री. श्रीनिवास कमबलवाड, नगरसेवक, रा. बाळापुर, ता. धर्माबाद, जि. नांदेड** यांनी आपला मुद्दा उपस्थित करताना विचारले की, या प्रोजेक्टमुळे त्यांच्या गावाचा काय फायदा होणार आहे ? | **श्री. राजेश मानकर, पर्यावरण सल्लागार** यांनी त्यावर उत्तर देतांना सांगितले की, या प्रोजेक्ट मुळे गावाचा काय फायदा होईल हा खूप चांगला प्रश्न विचारला, असे त्यांनी म्हटले. त्यावर ते म्हणाले की, या प्रोजेक्टमध्ये रोजगाराची जी संधी आहे ती कमी आहे, फक्त ११ लोकांना त्यामध्ये रोजगार मिळणार आहे. कारण हा प्रकल्प खूप छोटा आहे. त्यानंतर त्यांनी सांगितले की, कुठल्याही प्रकल्पामध्ये डायरेक्ट किंवा सरळ रोजगार निर्मिती नाही झाली तरी त्या प्रकल्पाला लागून | |



होळकर

| | | | |
|---|---|---|---|
| | | असलेले दुसरी कामे राहतात. त्याच्यामुळे त्या परिसराचा विकास होतो. लोकांना उपजीविकेच नवीन साधन मिळते. तसेच या प्रकल्पाची जी प्रोजेक्ट कॉस्ट आहे त्यापैकी २% हे कॉर्पोरेट एनव्हॉरनमेन्ट रिस्पॉन्सीबिलीटी अंतर्गत खर्च केला जाणार आहे आणि तो खर्च धर्माबाद व बाळापुर या नगर पालिकेचा जो एरिया आहे त्या विभागावर केल्या जाणार. त्यांची जी मागणी किंवा त्यांच्या ज्या काही सुचना राहील, त्या सूचनेनुसार प्रकल्प प्रस्तावक ते पैसे धर्माबाद आणि बाळापुर या गावातील लोकांच्या विकासासाठी खर्च करणार. या प्रकल्पाचे फायदे अनेक आहेत आर्थिक, सामाजिक, डायरेक्ट आणि इंडायरेक्ट, असे त्यांनी थोडक्यात सांगितले. | |
| 3 | **श्री. राजू सुरकूटवार, नगरसेवक रा. बाळापुर, ता. धर्माबाद, जि. नांदेड** यांनी आपला मुद्दा उपस्थित करताना विचारले की, दुषित पाण्यावर या प्रकल्पामध्ये काय प्रक्रिया करणार आहात ? | **श्री. राजेश मानकर, पर्यावरण सल्लागार** यांनी उत्तर दिले की, या प्रकल्पामध्ये जी पाण्याची गरज आहे ती ३७ KLD राहणार आणि त्या ३७ KLD मधनं ज्या ताज्या पाण्याची गरज राहणार आहे, ही फक्त १५.३८ KLD राहणार. तसेच यामधील जे दुषित पाणी निघणार आहे, त्या दुषित पाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी इफ्लुएंट ट्रीटमेन्ट प्लांट राहणार आहे. तसेच इफ्लुएंट ट्रीटमेन्ट प्लांट मध्ये दुषित पाण्यावर प्रक्रिया करून त्या पाण्याचा पुनर्वापर या प्रकल्पामध्ये करण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले. या प्रकल्पाला पाण्याची खरोखर गरज ही ३७.४८ KLD किंवा मीटर क्यूब आहे. तसेच प्रकल्पाला ताज पाणी हे फक्त १५.३८ KLD आहे. म्हणजेच या प्रकल्पामध्ये जवळपास २१ KLD | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ते २२ KLD इतके ताजे पाणी वाचवल्या जाणार आहे. ते याप्रकारे की, जे प्रकल्पामधून निघणार दुषित पाणी आहे त्यावर पुनर्प्रक्रिया करून ते पाणी परत प्रोसेस मध्ये वापरल्या जाईल आणि यासाठी प्रकल्प प्रस्तावका तर्फे इफ्लुएंट ट्रीटमेन्ट प्लांट लावल्या जाईल, असे त्यांनी सांगितले. | |
| 4 | **श्री. रवींद्र पोतगंट्टीवार, रा. बाळापुर, ता. धर्माबाद, जि. नांदेड भारतीय जनता पार्टी किसान मोर्चा, जिल्हाध्यक्ष** यांनी आपला मुद्दा उपस्थित करताना सर्वप्रथम त्यांनी जन सुनावणीमध्ये उपस्थित असणारे अधिकारी तसेच नागरिक यांना सांगितले की, देशाचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदीजी यांनी २०४७ पर्यंत विकसित भारताचे स्वप्न बघितले आहे. या विकसित भारतामध्ये कृषी आधारित उद्योग आणि या कृषी आधारीत उद्योगांसाठी आज कालचे नविन तरुण उत्सुक आहे, असे त्यांनी सांगितले. नवीन तरुण उद्योजकांना अधिकारी लोकांनी प्रोस्ताहित करून त्यांचे उद्योग लवकरात लवकर कसे चालू होतील, हे बघावे. एखादा प्रोजेक्ट मंजूर करायचा असेल तर ते लवकरात लवकर केला पाहिजे, असे त्यांचे म्हणणे होते. तसेच त्यांनी त्यावर सांगितेले की, हा जो प्रोजेक्ट आहे तो कृषी आधारीत असल्यामुळे त्याचा शेतकऱ्यांना इनडायरेक्ट फायदा होईल आणि हा बायोप्लांट्स प्रोजेक्ट असल्यामुळे त्याचा पण बाकी लोकांना फायदा होईल डायरेक्ट आणि इनडायरेक्ट या पद्धतीने. तसेच या क्षेत्राशी निगडीत खूप लोक असल्यामुळे त्यांचा पण याच्यात फायदा होणार, असे ते म्हणाले. तसेच या प्रकल्पामध्ये जरी १० – ११ लोकांना रोजगार मिळणार असेल पण तरी डायरेक्ट आणि | **श्री. राजेश मानकर, पर्यावरण सल्लागार** यांनी सांगितले की, प्रकल्प धारक हा तरुण आहे. त्याचे स्वागत व्हायला पाहिजे. तो तरुण उद्योजक या प्रकल्पामध्ये गुंतवणूक करून आर्थिक, सामाजिक व रोजगाराच्या संधी प्रकल्पाच्या भोवतालच्या परिसरामध्ये उपलब्ध करून देणार आहे. | |



ठोळकर

| | | | |
|---|---|---|---|
| | इनडायरेक्ट खूप लोकांना रोजगार मिळणार आहे, असे त्यांनी सांगितले. त्यानंतर त्यांनी प्रकल्प प्रस्तावक श्री. चंद्रकांत पाटील यांना शुभेच्छा देऊन विनंती केली. तसेच त्यांनी युद्धजन्य परिस्थिती बद्दल बोलतांना सांगितले की, युद्धजन्य परिस्थितीमध्ये डीझेल साठी अडचण निर्माण झाली होती. त्यामुळे असे डीझेल किंवा इथेनॉल चे प्रोजेक्ट्स झाले तर इतर देशावर अवलंबून राहायची गरज पडणार नाही. त्यानंतर त्यांनी सन्माननीय अध्यक्ष आणि प्रदूषण नियंत्रण मंडळ अधिकाऱ्यांना विनंती केली की, पर्यावरण विषयक जे काही मानांकन आहे त्या मानांकन नियमाचे पालन होईल, अशी शाश्वती आहे. त्याबद्दल अडचण नाही, असे ते म्हणाले. अशा उद्योजक तरुणांना प्रोत्साहित करून त्यांचे उद्योग लवकरात लवकर सुरु केले पाहिजे. तसेच त्यांनी या प्रोजेक्ट बद्दल सांगितले की, हा प्रोजेक्ट मागिल दोन वर्षापासून प्रलंबित पडून आहे. एखादा नवीन उद्योग टाकायला खूप अडचण येते, पाच पन्नास लाख – करोडो रुपये टाकावे लागते, खूप अडचण होते. त्यावर त्यांनी अधिकाऱ्यांना कळकळीची विनंती केली की, एखादा तरुण उद्योजक येणार असेल तर त्यांना आपण प्रोत्साहन करून लवकरात लवकर प्रकल्पाला सुरुवात कसे होईल, याची काळजी घेतली पाहिजे असे ते म्हणाले. | | |
| 5 | **श्री. शिवाजीराव पटवारी, वरिष्ठ प्राध्यापक, रा. धर्माबाद, जि. नांदेड** त्यांनी आपले मुद्दे मांडताना सर्वप्रथम त्यांनी व्यासपीठावर उपस्थित असलेले मान्यवर, बंधू भगिनी आणि श्री. चंद्रकांत पाटील यांचे अभिनंदन करून सांगितले की, जे प्रेझेंटेशन झाले ते अतिशय व्यवस्थित केलेलं आहे. त्यांनी म्हटलं की, अशा इंडस्ट्रीजची धर्माबादलाच नाही | **श्री. शंतनू पाटील, रा. धर्माबाद, प्रकल्प प्रस्तावक** यांनी श्री. शिवाजीराव पटवारी यांनी आपले म्हणणे मांडल्याबद्दल धन्यवाद म्हणाले. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | तर देशाला सुद्धा गरज आहे. त्यांनी असे म्हटले की, मी महाविद्यालयाचा प्रोफेसर म्हणून बोलतोय की, हा प्रोजेक्ट किती फायद्याचा ठरणार आहे. तसेच हा प्रोजेक्ट इट इझ लेस पोल्युटेड कॅम्पेअर टू पेट्रोल – डीझेल. यातून निघणारे कार्बन डाय ऑक्साइड, कार्बन मोनोक्साइड हे फार कमी प्रमाणात हवेत मिसळतात. तसेच वॉटर पोल्युशन देखील कमी होते. त्यामुळे असे प्रोजेक्ट उभारणे ही धर्माबादची नव्हे तर काळाची गरज आहे, असे ते म्हणाले. तसेच त्यांनी सांगितले की, आपण सर्व नवीन शैक्षणिक धोरणामध्ये आहोत. नवीन शैक्षणिक धोरणामध्ये (ऑन द जॉब ट्रेनिंग) हा कोर्स सरकारनी कंपलसरी लागू केलेला आहे. ते तिसरी पासून सुरु आहे. तिसरीच्या विद्यार्थ्यांना वर्षाचे दहा तास प्रोजेक्ट करायचा आहे. त्यानंतर त्यांनी सांगितले की, त्या विद्यार्थ्यांच्या गावामध्ये सुतार उपलब्ध आहे, कार्पेंटर उपलब्ध आहे तसेच गवंडी उपलब्ध आहेत त्यांच्यासोबत त्या विद्यार्थ्यांना प्रोजेक्ट करायचा आहे, असे ते म्हणाले. तसेच बारावीच्या विद्यार्थ्यांना, डिग्रीच्या विद्यार्थ्यांना आणि पदवीधर विद्यार्थ्यांना प्रोजेक्ट हे कंपलसरी आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की, ते विद्यार्थी इंडस्ट्रीज मध्ये गेले पाहिजे आणि ऑन द जॉब ट्रेनिंग केल पाहिजे. ते सांगतात की, गेले तीस वर्ष झाले ते **MSC** केमेस्ट्री ला शिकवत आहेत. इथे इंडस्ट्रीज नसल्यामुळे त्यांचे विद्यार्थी शहरात जातात, पुण्याला जातात, औरंगाबादला जातात. अशी इंडस्ट्रीज इथे होणे त्यांच्या महाविद्यालयाच आणि धर्माबादचं नशीब आहे, असे ते म्हणाले. महाविद्यालयाच, शिक्षणाच आणि इंडस्ट्रीजचं कोलॅबोरेशन होण अत्यंत आवश्यक आहे, असे ते म्हणाले. त्यांनी सांगितले की, ते वर्गात थिअरी शिकवतात. पण प्रॅक्टिकली | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | विद्यार्थी काम करतात जेणेकरून विद्यार्थी स्वयंरोजगारीत होऊन देश सुजलाम सुफलाम होईल. या प्रोजेक्टची अत्यंत गरज आहे. त्यामुळे हा प्रोजेक्ट लवकरात लवकर सँक्शन करावे, असे त्यांनी त्या ठिकाणी सुचविले. | | |
| 6 | **श्री. योगेश जायशेट, रा. बाळापुर, ता. धर्माबाद, जि. नांदेड** यांनी आपला मुद्दा उपस्थित करताना विचारले की, या प्रकल्पामध्ये **CSR** प्रस्तावित आहे का ? | **श्री. राजेश मानकर, पर्यावरण सल्लागार** यांनी उत्तर देतांना सांगितले की, या प्रकल्पा मधील प्रोजेक्ट कॉस्ट ही ५ करोडच्या जवळपास असून त्याच्या २% म्हणजेच १० लाखाच्या जवळपास ची रक्कम प्रकल्प प्रस्तावका तर्फे जो त्या परिधीमध्ये येतो जसे धर्माबाद, बाळापुर वगैरे यांना त्यांच्या गरजेनुसार जे ते सांगतील त्यानुसार तो फंड प्रकल्प प्रस्तावका तर्फे त्या नगर पंचायतला त्या कामासाठी खर्च केला जाईल. | |
| 7 | **श्री. साईकुमार (ऍडव्होकेट), रा. बाळापूर, ता. धर्माबाद, जि. नांदेड** यांनी आपला मुद्दा मांडतांना विचारले की, या प्रकल्पाचा मुख्य स्त्रोत पाणी असून त्याची उपलब्धता कुठून करणार ? आणि त्या पाण्याची उपलब्धता करतांना नागरिकांवर पाणी टंचाईचा प्रश्न उद्भवणार की नाही ? | **श्री. राजेश मानकर, पर्यावरण सल्लागार** यांनी उत्तर दिले की, प्रकल्पाला एकूण पाण्याची गरज ही प्रती दिवासाची ३८ KLD आहे. त्या पाण्यामध्ये फ्रेश वॉटर म्हणजेच ताज पाणी हे १६ KLD राहणार. त्यांनी सांगितलं की, १६ KLD म्हणजे १५ KLD चा टँकर होतो. १५ – १० KLD चा टँकर गावामध्ये सप्लाय केला जातो. तर १५ KLD म्हणजे १६.३७ KLD प्रतिदिवस या प्रकल्पाला पाण्याची गरज राहणार आहे. टँकरच पाणी हे प्रकल्प प्रस्तावक आपला प्लांट चालवण्यासाठी वापर करेल. कालांतराने सेंट्रल ग्राउंड वॉटर ऍथॉरिटीची परमिशन मिळाल्यानंतर ग्राउंड वॉटर युझ करून भविष्यामध्ये पाण्याची गरज पूर्ण केल्या जाईल. त्यांनी सांगितले की, या प्रकल्पाला पाण्याची खूप काही | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | गरज नाही. फक्त १५ KLD राहणार, १० – १५ KLD चा टँकर जो गावात फिरतो तेवढीच पाण्याची गरज या प्रकल्पाला राहणार. | |
| 8 | **श्री. इजळकर, निवृत्त प्राध्यापक, रा. धर्माबाद, जि. नांदेड** त्यांनी आपले मुद्दे मांडतांना सर्वप्रथम तरुण उद्योजक या क्षेत्रामध्ये आल्याबद्दल त्यांचे स्वागत केले. त्यांच्या म्हणण्या नुसार आजकाल प्रत्येकजण हा नौकरीसाठी शिक्षण घेत आहेत. परंतु हा उद्योजक हा सर्व बाबींना फाटा देऊन उद्योग क्षेत्रामध्ये पदार्पण करत आहे. त्यांनी सांगितले की, ग्रामीण भागामध्ये असे उद्योग सुरु होणे काळाची गरज आहे. गांधीजींनी खेड्याकडे चला, असे म्हटले. आजचा शिकलेला तरुण हा खेड्यामध्ये राहायला तयार नाही. प्रत्येक जण शहराकडे जातो. इंजिनियर झालेली मुले मुंबईकडे जात आहे, कोणी बंगलोरला जात आहे. कुणीही खेड्यामध्ये राहायला तयार नाही, कारण इथे उद्योगाच्या फॅसिलिटी नाही आहेत. नवीन उद्योजक खेड्यातून सुरुवात करीत असेल तर त्यांना प्रोत्साहन करायला पाहिजे, असे ते म्हणाले. प्रकल्पाची परमिशन घेत असतांना अनेक कागदपत्रांची पूर्तता करावी लागते. बँकेकडून लोनची बरोबर व्यवस्था होत नाही. तिथे वारंवार चकरा माराव्या लागतात. त्यामुळे उदयोजक कंटाळून या नादाला लागत नाहीत. त्यामुळे अशा उद्योजकांना प्रोत्साहन देण हे शासना बरोबर सर्व अधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे, असे त्यांनी सांगितले. तसेच ते म्हणाले की, त्यांच्या कार्यामध्ये मदत करून कमीत कमी कागदपत्रांमध्ये त्या ठिकाणी लाईसेन्स किंवा परमिशन कसे मिळेल, याची पूर्तता करावी. त्यानंतर ते म्हणाले की, नांदेड हे जिल्ह्याच ठिकाण असूनही तिथे एकही उद्योग नाही आहेत. त्यामुळे शिकलेली मुल ही सिटीकडे जात आहेत. | **श्री. शंतनू पाटील, प्रकल्प प्रस्तावक, धर्माबाद** यांनी श्री. इजळकर यांनी या प्रकल्पाबद्दल आपले मत मांडल्याबद्दल त्यांना धन्यवाद म्हणाले. | |

तेळकर

| | | | |
|---|---|---|---|
| | तालुक्याच्या ठिकाणी कुठेही उद्योग नाही आहेत. भोकर MIDC आहे. पण फक्त बोर्डच लागलेला आहे. एकही उद्योग नाही आहे. धर्माबादला मिरचीशिवाय इतर दुसरे कोणतेही उद्योग नाही आहे. ते पण पूर्ण पोल्युशनचेच काम आहे. या ठिकाणी समाजाला काहीतरी फायदा मिळेल असा एकही चांगला उद्योग नाही या ठिकाणी. त्यामुळे या उद्योजकाला सहाय्य करणे गरजेचे आहे असे त्यांनी सांगितलं. ते शासकीय यंत्रणेला विनंती करीत म्हणाले की, त्यांच्या ज्या काही अडचणी आहेत त्या आपण सोडवाव्यात आणि ग्रामीण भागामध्ये जास्तीत जास्त उद्योग कसे सुरु होतील, ग्रामीण भागाचा विकास कसा होईल याकडे लक्ष द्यावे. त्यांनी सांगितले की, ग्रामीण भागामध्ये म्हातारेच आहेत. त्यांच्या मता नुसार गावामध्ये आणि इतर ठिकाणी शिकलेली मुले ही सिटीमध्ये जातात आणि गावामध्ये फक्त म्हातारे लोक आहेत. हे जे विधारक चित्र आहे ते केवळ उद्योग नसल्यामुळे किंवा उद्योगधंदे नसल्यामुळे होत आहे. म्हणून ग्रामीण भागामध्ये उद्योगाला सुरुवात व्हावीत आणि त्यासाठी सर्वांनी त्यांना प्रोत्साहित करावे, असे त्यांनी त्या ठिकाणी सुचविले आहे. | | |
| 9 | | **श्री. राजेश मानकर, पर्यावरण सल्लागार** यांनी उत्तर दिले की, बायो डिझेलसाठी असं स्टँडर्ड नाही आहे. त्याच जे रॉ – मटेरीअल हे फॅटी ॲसिड राहणार आणि तेलबिया आणि सॉल्वट एक्सट्रॅक्टस जे राहणार आहे त्याच्यापासून हे प्रक्रिया होवून बायोडिझेल निर्माण होणार आहे. त्यांनी सांगितले की, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे अर्ज सादर केल्यानंतर त्यावेळेस डिजीसेट साठी मानक राहणार आणि वायू प्रदूषण नियंत्रण प्रणाली | **श्री. मनीष होळकर, समिती सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी** यांनी सुचविले की, या प्रकल्पामध्ये जे बायोडिझेल तयार करणार आहेत त्याचे शासनाने आणून दिलेले काही स्टँडर्ड आहे का ? जे अचिव करायचे आहेत पुढे बायोडीझेलसाठी. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | त्यामध्ये थर्मिक फ्लुइड हिटर राहणार आहे. | |
| | | **प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार** यांनी माहिती देतांना सांगितले की, या प्रकल्पामध्ये जे स्पेसीफिकेशन आहे ते **ISI** स्टँडर्ड प्रमाणे होणार आहे. | |
| 10 | | **प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार** यांनी माहिती देतांना सांगितले की, नाही, ते तयार होणार आहे स्टँडर्ड प्रमाणे. | **श्री. सुर्यकांत शिंदे, समिती संयोजक तथा उपप्रादेशिक अधिकारी** यांनी विचारले की, स्टँडर्ड प्रमाणे डायरेक्ट तयार होणार आहे का ?. |
| 11 | | **प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार** यांनी माहिती देतांना सांगितले की, इट इझ ऑलमोस्ट १.५% कॅटॅलीस्ट २०% मिथीनॉल लागतो. १.५% ऑफ दॅट व्हील बी वेस्टेज अशा पद्धतीने वॉटर रिकवर केल्यानंतर जे थोडं ट्रेस अमाउंस राहतात. तेवढ वॉटर त्याच्यामध्ये राहील. शेवटी जे उरलेले अर्धे युझ होणार आहे त्याच्यामध्ये ऑईल कंटेनर्स असेल ते पण प्रोजेक्टच्या रेशोमध्ये येते. प्रॉडक्टच्या १.५ – २ % च्या वर जाणार नाही. तसेच त्यांनी अजून एका विषया बद्दल सांगितले की, या प्रोजेक्टमुळे गावाला काय फायदा होणार? जेव्हा प्रोजेक्ट करायचा चालला होता तेव्हा डिस्कशन झाल तेव्हा हा विषय आला होता की, नांदेड मधील लँड चीपर होती आणि तिथे पोल्युशन आणि बाकी नॉर्म्स स्ट्रिक्ट असल्यामुळे प्रकल्प प्रस्तावकाच असे म्हणणे होते की, हा प्रोजेक्ट इथेच करावं, त्यासाठी कोणाला तरी हिम्मत करावं लागेलच. तसेच त्यांनी सांगितले की, जेव्हा हा प्लांट चालू होईल तेव्हा टँकर्स येतील, तेव्हा वेगवेगळे | **श्री. मनीष होळकर, समिती सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी** यांनी विचारले की, जे तीन प्रकारचे वेस्ट निघतात जसे एक स्पेट मिथीनॉल, दुसर डीस्लेशन रेसिडीव्ह, अल्कली रेसिड्यु त्याच प्रमाण किती निघणार ? |

होळकर

| | | | |
|---|---|---|---|
| | | लोक भेटतील, त्यांच्या खाण्या — पिण्याची व्यवस्था. तसेच एक उद्योग उभा राहिला तर इलेक्ट्रिसिटी येईल. त्याच्यानंतर बाकीचे लोकसुद्धा तिथे उभारण्यास धाडस करतील. अशा पद्धतीने बघायला पाहिजे म्हणजे १० — ११ लोकांव्यतिरिक्त लार्जर स्कोप तिथे बघायला मिळेल, असे त्यांनी सांगितले. | |
| 12 | | **प्रकल्प तांत्रिक सल्लागार** यांनी त्यावर उत्तर देतांना सांगितले की, ९६.७% जी आहे ते **BIS** स्टॅंडर्ड पर्यंत एक्सेप्टेबल आहे आणि तेच या प्रकल्पामध्ये अचिव करणार. आणि त्यांनी सांगितले की, इंडिअन ऑईल आणि **BPCL** या कंपन्यांना टेंडर मध्ये सप्लाय करणार आहे. | **श्री. मनीष होळकर, समिती सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी** यांनी विचारले की, या प्रकल्पाची कंपॅटिबिलिटी काय राहील? पेट्रोल मध्ये मिक्स करावं लागेल. |
| 13 | **श्री. हिराकांत भुजंग वाघमारे, सरपंच, रा. आतकुर** यांनी पुढील मुद्दे उपस्थित करून सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. त्यांनी सांगितले की, हा जो प्रकल्प जे नवयुवक ग्रामीण विभागामध्ये होत आहे त्याचा खूप अभिमान असून या प्रकल्पाबाबत त्यांनी आपली सहमती दर्शविली. तसेच जास्तीत जास्त सुशिक्षित आणि नवयुवक तरुण आहे त्यांना रोजगार उपलब्ध करून द्यावे, असे त्यांनी सुचविले. | **श्री. शंतनू पाटील, प्रकल्प प्रस्तावक, रा. धर्माबाद, जि. नांदेड** यांनी श्री. हिराकांत भुजंग वाघमारे यांनी प्रकल्पाबाबत त्यांची सहमती दर्शविल्या बाबत त्यांना धन्यवाद म्हटलं. | |
| 14 | **श्री. बाबुराव मारुती पाटील, माजी सरपंच, अलुर** यांनी पुढील मुद्दे उपस्थित केले की, बाळापुर आणि धर्माबाद वासीयांना रोजगार मिळेल काय ? रोजगारांचा काही फायदा आहे का या प्रकल्पामध्ये ? | **श्री. राजेश मानकर, पर्यावरण सल्लागार** यांनी उत्तर दिले की, या प्रकल्पामध्ये प्रत्यक्ष किंवा डायरेक्ट एम्प्लॉयमेंट जे आहे ते अकरा व्यक्ति मुख्यत्वे करून स्थानिक भागातीलच राहतील. त्या व्यतिरिक्त अप्रत्यक्ष जो फायदा आहे तो परिसरातील जनतेला १००% होणारच असे त्यांनी | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सांगितले. | |
| 15 | **श्री. रामराव लक्ष्मण आळे, उपसरपंच, रा. अलुर** यांनी पुढील मुद्दे उपस्थित केले, सर्वप्रथम त्यांनी व्यासपिठावरील सर्व पाहुणे मंडळी व पदाधिकारी यांचे स्वागत करून आपले म्हणणे मांडले की, गोदावरी नदी जवळील जवळपास १९९२ ते ९५ पासून डायजो म्हणजे या अगोदर पायोनियर फॅक्टरी चालू आहे. भरपूर पाण्याचा विसंगत होतो पण त्यामुळे अजूनपर्यंत पाणी टंचाई भासली नाही. याच्या अगोदर दुष्काळ आला होता. पण त्यावेळेसही पाणी टंचाई वगैरे उद्भवलेली नाही. त्यामुळे या छोट्याश्या प्रकल्पामुळे पाणी टंचाई उद्भवणार, असे त्यांना अजिबात वाटत नाही. त्यांनी सांगितले की, श्री. चंद्रकांत पाटील आणि शंतनू पाटील यांनी या ठिकाणी एवढ मोठ भांडवल टाकून एक धाडस निर्माण केल. ग्रामीण भागातून एक नवयुवक धाडस निर्माण करून असा प्रकल्प तयार करील, अशी कधीच आशा बाळगली नाही. कारण कुणी राजकारणामध्ये उतरतील, इतर व्यापार किंवा व्यवसायामध्ये उतरतील. पण या प्रोजेक्टमुळे अनेक प्रोजेक्ट तयार होतील, असे ते म्हणाले. तालुक्याचे नाव लौकिक होतील, बेरोजगारांना रोजगार मिळेल. भविष्यामध्ये हा प्रकल्प वाढेल, अशी आशा त्यांनी बाळगली. तसेच त्यांनी चंद्रकांत पाटील आणि शंतनू पाटील यांचे अभिनंदन करून त्यांचा त्यांना अभिमान वाटतो, असे ते म्हणाले. नवीन उद्योजक निर्माण व्हावेत, रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हावेत अशी ते विनंती करतात. त्यांनी मा. अध्यक्ष, जिल्हाधिकारी साहेब यांना एवढच सांगायची इच्छा दर्शविली की, अकरा रोजगार लागतील किंवा प्रकल्प वाढून प्रकल्पावर मजूर लागतील तर स्थानिक लोकांनाच रोजगार द्यावा, असे त्यांनी मा. | **श्री. शंतनू पाटील, रा. धर्माबाद, प्रकल्प प्रस्तावक** यांनी आभार मानले. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | पाटलांना सुचविले. पायोनियर फॅक्टरीमध्ये जवळपास ५०० - १००० रोजगार लागतात. पण तेथील कॉन्ट्रॅक्टदार अशा पद्धतीने व्यवसाय करतात की, ते बाहेर राज्यातून बिहारमधून, राजस्थानमधून कमी पैश्यामध्ये रोजगार घेऊन येतात. त्यावर ते म्हणाले की, त्यांच्या क्षेत्रातील बेरोजगार युवक शिक्षण घेवून शेती काम करीत आहेत. त्यांनी श्री. चंद्रकांत पाटलांना विनंती करून म्हणाले की, भविष्यामध्ये प्रकल्प वाढून मजूर १०० लागतील किंवा १००० लागतील तर ग्रामीण पातळीवरील नविन युवकांना रोजगार द्यावा . ग्रामीण भागातील रोजगारांना काम मिळेल अशी काही तरी उपाययोजना कराव्या, असे त्यांनी सुचविले. | | |
| | श्री. साईनाथ चपळे, उपसरपंच, बनाळी यांनी पुढील मुद्दे उपस्थित करीत सांगितले की, मौजा बनाडी येथे सर्वात मोठी डालडा फॅक्टरी होती ती बंद झाली. त्यानंतर धर्माबादमधील कोणताही उद्योजक किंवा नवयुवक उद्योग करण्यासाठी समोर आला नाही. कोणी दुकान टाकले, मुनीम राहिले, शिक्षण घेवून नौकरी केली. त्यांनी श्री. चंद्रकांत पाटील यांचे मनपूर्वक आभार मानले. ते म्हणाले की, फॅक्टरी बंद झाल्यानंतर काही तरी नवीन कल्पना घेवून फॅक्टरी टाकण्याचा मानस समोर घेवून आज कागदपत्रांसाठी सभा घेतली. बँकेमध्ये एकलविंडो प्रकल्प असते, त्याप्रमाणे त्यांनी विनंती करीत म्हटलं की, टोकाला असलेल्या तेलंगाना बॉर्डरला असलेल्या गावामध्ये प्रगती करू इच्छिणाऱ्या उद्योजकाला जे काही तांत्रिक अडचणी, जसे ग्रामीण भागातील असल्यामुळे त्यांना पर्यावरण झाडं लावणे एवढंच माहित आहे. ते अधिकाऱ्यांना म्हणाले की, जे काही तांत्रिक बाजू आहे, ते | श्री. शंतनू पाटील, रा. धर्माबाद, प्रकल्प प्रस्तावक यांनी आभार मानले. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | तपासून लवकरात लवकर एकलविंडो प्रकारे त्यांना परवानगी देऊन लवकरात लवकर फॅक्टरी चालू करण्यासाठी परवानगी द्यावी असे त्यांनी सुचविले. | | |

जनसुनावणी समितीच्या अध्यक्षांनी आपल्या समारोपाच्या भाषणात आश्वासन दिले की, जनसुनावणी दरम्यान उपस्थित करण्यात आलेले सर्व मुद्दे जनसुनावणीच्या इतिवृत्तात समाविष्ट करण्यात येतील. तसेच जनसुनावणीची कार्यवाही महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व हवामान बदल विभागाकडे पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सादर करण्यात येईल, असे स्पष्ट केले.

पर्यावरणीय जनसुनावणी समितीच्या सदस्यांनी उपस्थित सर्व स्थानिक नागरिक, प्रकल्प प्रतिनिधी, पर्यावरण तज्ज्ञ तसेच इतर उपस्थितांचे आभार मानून जनसुनावणीची सांगता झाल्याचे घोषित केले.

अध्यक्षांचे आभार मानून सभा समाप्त झाली.

**(सुर्यकांत ज. शिंदे)**
समन्वयक लोकसुनावणी समिती
तथा उप प्रादेशिक अधिकारी,
म. प्र.नि. मंडळ, नांदेड

**(मनिष होळकर)**
सदस्य लोकसुनावणी समिती
तथा प्रादेशिक अधिकारी,
म. प्र.नि. मंडळ, छत्रपती संभाजीनगर

**(डॉ. रत्नदीप गायकवाड)**
अध्यक्ष, लोकसुनावणी समिती
तथा अपर जिल्हाधिकारी, नांदेड